I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S. (पोलीस ठाणे):** रामनगर **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0299 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/04/2025 16:39 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 07/04/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 10/04/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 12:15 तास **Time To (वेळेपर्यंत):** 22:30 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 11/04/2025 **Time (वेळ):** 15:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 051 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 11/04/2025 16:39 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** जिल्हा परीषद चंद्रपुर येथील, बांधकाम विभाग ईमारतीचे पुढे, चंद्रपुर ,चंद्रपुर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** लहु दिगांबर चव्हाण

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शांतीनगर, जिवती, जिवती, रामनगर, चंद्रपुर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | शांतीनगर, जिवती, जिवती, जिवती, चंद्रपुर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7030319601

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | हर्ष यशोराम बोहरे | | | 1. विजय नडार यांचे घरी कीरायाणे,अरीअंत नगर तुकुम,Town/Village (शहर / गाव): चंद्रपुर,Tehsil (तहसील): चंद्रपुर,Police Station (पोलीस ठाणे): रामनगर,District (जिल्हा): चंद्रपुर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुशील मारोती गुंडावार | | | 1. न्यु माडा कॉलणी कॉर्टर नं,ppl 356दाताला,Town/Village (शहर / गाव): चंद्रपुर,Tehsil (तहसील): चंद्रपुर,Police Station (पोलीस ठाणे): रामनगर,District (जिल्हा): चंद्रपुर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 3 | मतीन फारुख शेख | | | 1. अब्दुल हमीद चौक,बाबुपेठ वार्ड नं 3,Town/Village (शहर / गाव): चंद्रपुर,Tehsil (तहसील): चंद्रपुर,Police Station (पोलीस ठाणे): रामनगर,District (जिल्हा): चंद्रपुर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ध्वनी उपकरणे | पाच 32GB क्षमतेचे सॅन्डीक्स कंपनीचे मेमरी कार्ड | .00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | आरोपी क्र.1यांचा ऑपल कंपनीचा आयफोन 15 | 65,000.00 |
| 3 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | आरोपी क्र.2 यांचा ऑपल कंपनीचा आयफोन 15 | 82,900.00 |
| 4 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | आरोपी क्र.3 यांचा ऑपल कंपनीचा आयफोन 13 PRO | 50,000.00 |
| 5 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम 500रु.दराच्या 800व 200रु. दराच्या 100 नोटा | 4,20,000.00 |
| 6 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचरकमे व्यतीरक्त 500रु. दराच्या 1599नोटा | 7,99,500.00 |
| 7 | इतर | घरगुती वस्‍तु | लाचरक्कम ठेवलेली पीशवी | .00 |
| 8 | इतर | घरगुती वस्‍तु | आरोपी क्र.2 यांचा पॅन्ट | .00 |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 14,17,400.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद

दिनांक:-11/04/2025

ठिकाण:- चंद्रपूर

मी श्री. लहू दिगांबर चव्हाण वय 37 वर्ष, व्यवसाय- ठेकेदारी, रा. तहसील कार्यालय समोर, शांतीनगर, जिवती, ता. जिवती, जि. चंद्रपूर दि. 07/04/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथील श्रीमती. मंजुषा भोसले, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर यांना माझे मोबाईल क्र. 9673935581 यावरून फोन करून तक्रारीबाबत सांगीतले असता श्रीमती भोसले मॅडम यांनी मला तक्रार नोंदविण्याकरीता लाच रक्कम सोबत घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय चंद्रपूर येथे येण्यास सांगीतले. त्यावरून मी माझेकडे ठेकेदारीच्या कामातून मिळालेले रूपयांपैकी 4,20,000/- रूपये सोबत घेवुन 11/00 वाजता दरम्यान माझे हुंडाइ क्रेटा वाहन क्र. एमएच 31 एफए 8874 या चारचाकी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर येथे प्रत्यक्ष हजर आलो. त्यानंतर मी श्रीमती भोसले मॅडम यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने खालीलप्रमाणे तक्रार दिली.

“सविनय विनंती याप्रमाणे आहे की, मी वर नमुद पत्त्यावर आपल्या कुटुंबासह राहतो. माझेकडे बांधकाम करण्याचा आणि पाणीपुरवठा करण्याचा सन 2020 पासून रितसर शासकीय परवाना आहे. यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत विहीर खोदकाम करून बांधकाम करून देणे, विहीरीपासून ते गावाचे पाण्याचे टाकीपर्यंत पाईपलाईन काम करणे, पाण्याची टाकीचे बांधकाम करणे, पाईपलाईन टाकून नळ कनेक्शन जोडणी करणे तसेच विहीरींवर मोटार बसविणे, विहीरीसाठी पंपघर बांधकाम करणे या प्रकारचे कामे अंदाजप्रत्रकाप्रमाणे करणे यांचा समावेश आहे. सन 2022-2023 मध्ये जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील जिवती तालुक्यातील मौजा 1) देवलागुडा येथील 16,04,647/-रू., 2) रोडगुडा येथील 62,75,806/-रू., 3) मरकलमेंटा येथील 70,46,784/-रू., 4) करनकोंडी येथील 23,17,584/-रू., 5) कोदेपूर येथील 70,71,860/-रू., 6) नारपठार येथील 37,58,385/-रू., 7) चिनुपत्ती गुडा येथील 64,66,202/-रू., 8) लांबोरी येथील 33,63,194/-रू., 9) कमलापूर येथील 23,41,262/-रू., 10) सेवादास नगर येथील 22,43,768/-रू., 11) नोकेवाडा येथील 29,14,200/-रू., 12) परमडोली तांडा येथील 54,54,574/-रू., 13) दमपूर मोहदा येथील 65,44,907/-रू., 14) लभानगुडा येथील 54,61,501/-रू. व 35,30,296/-रू. 15) येरमी येसापूर येथील 42,27,339/-रू., 16) घनपठार येथील 53,15,889/-रू., 17) गडपांढरवाणी येथील 70,42,029/-रू., 18) टेकामांडवा येथील 86,63,986/-रू., 19) लिंगणडोह येथील 26,16,556/-रू., 20) सोनेगाव गुडा येथील 10,87,423/-रू. आणि राजुरा तालुक्यातील 21) बाम्बेझरी येथील 57,61,279/-रू., 22) बेलमपूर येथील 39,34,292/-रू., 23) मंगी येथील अंदाजे 14,00,000/-रू. या 23 गावांतील पाणीपुरवठा करण्याचे कामांचे अंदाजे 10,64,43,763 /- रूपये किंमतीचा ठेका मला जिल्हा परिषद चंद्रपूर येथून मिळालेले होता. त्यानुसार मी वरील कामे टप्याटप्याने करून त्यांची बिले मंजूरीकरीता जिल्हा परिषद चंद्रपूर येथील ग्रामीण पाणीपुरवठा विभागात सादर करीत असतो. आज रोजीपर्यंत वरील सर्व गावांतील 80 ते 90 टक्के कामे पूर्ण केलेली आहेत.

मी टप्याटप्याने केलेल्या कामांपैकी जिवती तालुक्यातील मौजा लभानगुडा, येरमी येसापूर, लिगनडोह, दमपूर मोहदा, कोदेपूर, रोडगुडा, नारपठार, गढपांढरवाणी आणि राजुरा तालुक्यातील बाम्बे झरी व

मंगी येथील कामांचे अंदाजे 02 कोटी रूपयांचे बिले जि.प. चंद्रपूर येथील ग्रामीण पाणीपुरवठा विभाग येथे जुन/जुलै 2024 मध्ये सादर केलेली होती. सादर केलेल्या बिलांपैकी दमपूर मोहदा, रोडगुडा, नारपठार, गढपांढरवाणी, कोदेपूर या गावांतील कामांचे मार्च 2025 चे पहिल्या आठवडयांमध्ये 43 लाख रूपयांची बिले मिळालेले आहेत.

मी माझे थकीत असलेल्या देयकांबाबत विचारणा करण्याकरीता दिनांक 28/03/2025 रोजी संध्याकाळी अंदाजे 04/00 वा. चे दरम्यान ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर येथील कार्यकारी अभियंता श्री. हर्ष बोहरे यांचेकडे गेलो. त्यावेळी श्री. हर्ष बोहरे यांनी मला जिवती आणि राजुरा तालुक्यात महाराष्ट्र शासनाच्या जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत केलेल्या कामांची आतापावेतो काढून दिलेली 43 लाख रूपयांचे देयके आणि बाकी असलेली देयके काढून देण्याकरिता 4,00,000/- रूपयाची लाचेची मागणी केली आणि सदरची रक्कम त्यांचे वरिष्ठ सहायक श्री. सुशील गुंडावार यांचेकडे देण्यास सांगितले. तसचे सदरची रक्कम दिली नाहीतर तुमचे उर्वरीत बिले मंजुर करणार नाही असे म्हणाले. त्यानंतर मी बोहरे साहेब यांचेशी काहीही न बोलता त्यांचे कक्षातून बाहेर येवून याबाबत वरिष्ठ सहायक श्री. सुशील गुंडावार यांचेकडे गेलो. त्यावेळी श्री. सुशील गुंडावार यांचेशी बोलणीदरम्यान त्यांनी सांगीतले की, श्री. बोहरे सांहेब यांनी त्यांचेकरिता 4,00,000/-रू. सांगीतले असुन जिवती तालुक्यातील मौजा मंगी या गावातील टंचाइचे बिल मंजुर करण्याकरिता व निधी मागविण्याकरिता श्री. सुशील गुंडावार यांनी त्यांचेकरीता 20,000/- रूपये द्यावे लागतील असे म्हणुन माझेकडून एकूण 4,20,000/- रूपयाची मागणी केली.

त्यानंतर मी दिनांक 29/03/2025 रोजी जिल्हा परिषद चंद्रपूर येथील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग येथे जावून वरिष्ठ सहायक श्री. सुशील गुडावार यांना भेटून 1,00,000/-रूपये देण्याचा प्रयत्न केलो असता त्यांनी मला म्हणाले की, बोहरे साहेब यांनी 4,00,000/- रूपये सांगीतलेले आहे व मी सुध्दा 20,000/- रूपये सांगीतले होते. तरी तुम्ही पूर्ण पैसे एकाच वेळी दया असे म्हणून 1,00,000/- रूपये घेण्यास नकार दिला. त्यानंतर मी त्यांना नाईलाजास्तव होकार देवुन पुर्ण पैशांची जुळवाजुळव करून आणुन देतो असे म्हणुन जि.पं. चंद्रपूर येथून परत आलो.

त्यानंतर मी दुस-या दिवशी दिनांक 30/03/2025 रोजी परिवारासह आमचे कुलदैवत पोहरादेवी, जि. वाशीम येथे धार्मीक कार्यक्रमाकरीता गेलो होतो. त्यानंतर धार्मीक कार्यक्रम पुर्ण करून मी दिनांक 06/04/2025 रोजी सायंकाळी माझे गावी परत आलो.

मला ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर येथील कार्यकारी अभियंता श्री. बोहरे यांना 4,00,000/- रू. व वरिष्ठ सहायक श्री. सुशील गुंडावार यांना 20,000/- रू. असे एकूण 4,20,000/- रूपयांची लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी आज दिनांक 07/04/2025 रोजी माझे मोबाईल क्र. 9673935581 यावरून आपले मोबाईलवर फोन करून तक्रारीबाबत सांगीतले असता आपण मला माझी तक्रार नोंदविण्याकरीता लाच रक्कम सोबत घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय चंद्रपूर येथे येण्यास सांगीतले. त्यावरून मी माझेकडे ठेकेदारीच्या कामातून मिळालेले रूपयांपैकी 4,20,000/- रूपये सोबत घेवुन 11:00 वाजता दरम्यान माझे हुंडाई क्रेटा वाहन क्र. एमएच 31 एफए 8874 या चारचाकी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर येथे प्रत्यक्ष हजर आलो.

महाराष्ट्र शासनाच्या जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत तालुका जिवती आणि राजुरा येथील एकूण 23 गावांमध्ये पाणीपुरवठा संबंधी केलेल्ल्या कामांपैकी 10 गावांतील कामांचे बिले ग्रामीणपुरवठा

विभाग येथे मंजुरीकरीता सादर केलेले होते, त्यापैकी 5 गावांचे कामांचे एकुण 43 लाख रूपयांचे बिले मला मिळालेले आहे. सदर काढुन दिलेले बिले व बाकी असलेले बिले काढून देण्याकरिता मला 4,20,000/- रूपये लाचेची मागणी करणारे ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर येथील कार्यकारी अभियंता श्री. बोहरे आणि वरिष्ठ सहायक श्री. सुशील गुंडावार यांचेविरुध्द माझी तक्रार आहे. मला ठेकेदारीच्या कामातून मिळालेल्या जमा रक्कमेपैकी 4,20,000/- रूपये आपलेकडे लाच रक्कम म्हणुन वापरण्याकरीता देत आहे. माझा ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर येथील कार्यकारी अभियंता श्री. बोहरे साहेब आणि वरिष्ठ सहायक श्री. सुशील गुंडावार यांचेशी कोणताही आर्थिक व उसणवारीचा व्यवहार नाही.

करीता मला लाचेची मागणी करणाऱ्या या ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर येथील कार्यकारी अभियंता श्री. बोहरे आणि वरिष्ठ सहायक श्री. सुशील गुंडावार यांचेविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत कायदेशीर कारवाई होणेस मी लेखी तक्रार देत आहे.'' याप्रकारची लेखी तक्रार दिली होती.

यानंतर भोसले मॅडम यांनी 13/10 वा. दरम्यान त्यांचे कार्यालयात हजर असलेल्या एका कर्मचा-याला बोलावुन मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चंद्रपूर यांचे नावे दोन पंच आणणेकरीता रवाना केले. त्यांनतर अदांजे 14/00 वा. दरम्यान सदर कर्मचारी दोन पंचासह कार्यालयात परत आले. त्या पंचाना भोसले मॅडम यांनी त्यांची नावे विचारून माझी त्यांचेशी व ऑफीसच्या स्टाफशी ओळख करुन दिली. त्यांनतर भोसले मॅडम यांनी दोन्ही पंचांना मी दिलेल्या तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर मी सही करून दिलेल्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी व भोसले मॅडम यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर भोसले मॅडम यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर भोसले मॅडम यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर भोसले मॅडम यांनी मला सापळा कारवाईकरीता रक्कम जमा करण्याकरीता सांगितले असता मी माझेकडील ठेकेदारीच्या कामातून मिळणलेल्या पैशातून 4,20,000/- रू. ज्यामध्ये (रू. 500/- दराच्या 800 नोटा आणि 200/-रू. दराच्या 100 चलनी नोटा) सापळा कारवाईसाठी दिल्या. सदर नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. सदर नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म समजावले व एका को-या पांढ-या कागदावर अँथ्रॅसिन पावडर लावून प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर मी जमा केलेल्या सर्व नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावून सदर नोटा एका लिफाप्यात टाकुन सदर लिफाफा भोसले मॅडम यांनी स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरून मी माझे तक्रारीसंबंधाने माझे कामाची वक्र आर्डरच्या प्रती भोसले मॅडम यांचेकडे सादर केल्या. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सूचनेप्रामणे सदर प्रतीच्या छायांकित प्रती पो.हवा. रोशन चांदेकर यांचे हस्ते काढून घेतल्या. सदर प्रतीवर मी, भोसले मॅडम आणि दोन्ही पंच यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

त्यानंतर भोसले मॅडम यांनी मला गैरअर्जदार श्री. बोहरे कार्यकारी अभियंता, आणि वरिष्ठ सहायक

श्री. सुशील गुंडावार हे मला कुठे भेटतील असे विचारले असता मी त्यांना सांगीतले की, ते दोघेही यावेळी जिल्हा परिषद चंद्रपूर येथील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयात हजर असल्याचे सांगितले असता भोसले मॅडम यांनी पुढील कार्यवाही जिल्हा परिषद चंद्रपूर येथील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयात येथे पाठवून करणार असे सांगितले. (याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा क्र. 1 भोसले मॅडम यांनी तयार केला.)

त्यानंतर पंचासमक्ष गैरअर्जदार श्री. बोहरे कार्यकारी अभियंता, आणि वरिष्ठ सहायक श्री. सुशील गुंडावार यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगुन भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.

पडताळणी कार्यवाहीच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्यानंतर भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन असल्याचे सांगुन मेमरी कार्ड व व्हाईस रेकार्डरमध्ये कोणतीही फाइल नसल्याची खात्री केली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांचेसोबत पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे भोसले मॅडम, मी, पंच क्र. 1 व पंच क्र. 2 नी वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझ्या गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर माझे चारचाकी वाहन क्र. एम.एच.31 एफ.ए 8874 नी पंच क्र. 01 यांचेसह ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथून ग्रामीण पाणीपुरठा कार्यालय, जिल्हा परिषद चंद्रपूर येथे पडताळणी करीता दुपारी अंदाजे 03/07 वा. दरम्यान पाठविले. मी व पंच क्र. 1 सोबत जिल्हा परिषद चंद्रपूर येथे गेलो. तेथे बाहेरच माझे चारचाकी वाहन पाक्र करून पंचासह ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयात गेलो असता तिथे गैरअर्जदार गुंडावार हे त्यांचे टेबलावर बसुन होते.

त्यानंतर मी गुंडावार यांना 'का म्हणता सुशीलभाऊ' असे म्हणून पंच क्र. 1 यांना हळुच ईशाऱ्याने हेच गैरअर्जदार गुंडावार, वरीष्ठ सहायक असल्याचे सांगितले. त्यावेळी पंच क्र. 1 हे सुध्दा माझे बाजुलाच थांबले होते. त्यांनतर मी गुंडावार यांना 'साहेबांना बोलुन घ्या जाऊनं आता, याच्यासाठी, लभानगुडा अनं हे दोन' असे म्हणाले. त्यावर गुंडावार यांनी मला 'सगळे गुडे मारून देतो. अनं उदया तुले सगळे भेटल.' असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना 'नक्की' असे म्हणाले असता त्यावर गुंडावार यांनी मला 'पण माझे पंधरा हजार वापस करायचे' असे म्हणाले. त्यावर मी गुंडावार यांना 'पंधरा दिले हो. काहीही म्हणू नका, ते टंचाईचं काय? ' असे म्हणालो असता त्यावर गुंडावार यांनी मला 'किती दयायचे राहिले आता.' असे म्हणाले असता मी त्यांना 'टंचाईचे द्यायचे आहे' असे म्हणालो. त्यावर गुंडावार यांनी मला 'साहेबांचे द्यायचे आहे, माझे द्यायचे आहे.' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 'टंचाईचे किती, टंचाईचे' असे म्हणालो असता त्यांनी मला 'एक परसेंट' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 'तिथं चौदाच लाखाचं काम आहे' असे म्हणालो. त्यावर गुंडावार यांनी मला 'चौदाचे द्या लागणार नं' असे म्हणाले असता त्यावर मी त्यांना 'तुम्ही वीस म्हणे नं, साहेबांकडे जावून येऊ, सुशीलभाऊ जाऊन येवू' असे गुंडावार यांना म्हणालो असता गुंडावार यांनी मला 'जाऊन ये नं' असे म्हणाले. त्यावर मी गुंडावार यांना 'तुम्ही यायला पाहिजे' असे म्हणालो असता गुंडावार यांनी 'मी

येतो नं, तु जा' असे मला म्हणाले. त्यानंतर गुंडावार यांचे टेबलच्या बाजुचे टेबलवर काम करत असलेले अमोल यांना 'अमोल भाऊ ते आपल्या दोन फाईली कुठं आहे?, दोन्ही लिंगणडोह आणि बॉम्बेझरी' असे म्हणालो. त्यावर अमोल यांनी 'आहे नं, आता काहीच नाही आता तुमचा दंड होता नं' असे म्हणाले. त्यावर मी अमोल यांना 'दंड माफीसाठी पाठविला होता नां' असे म्हणालो असता त्यावर अमोल यांनी ' सुशील भाऊला दाखवून दे' असे मला म्हणाले त्यावर मी गैर अर्जदार गुंडावार यांना 'हे काय झाल दंड माफीसाठी फाईल मी पाठवली होती, आता काय लिहुन पाठवल होत तर बघा बर, आताची टिपणी कुठ आहे हो' असे म्हणालो. त्यावर गैर अर्जदार गुंडावार यांनी 'हे दंडासहीत मुदतवाढ झाली, दंडासहित मुदतवाढ आहे तुझी, शंभर रूपये पर डे' असे मला म्हणाले असता त्यावर मी गुंडावार यांना 'हे दंडासहित ठिक आहे आणि जे दंड दिलेला आहे तो म्हणत आहे, माफ करण्यासाठी पाठविला होता' असे म्हणालो असता त्यावर अमोल यांनी 'लबानगुडा टाकला हो की दुसरा हो दंड वाला' असे म्हणाले. त्यावर मी अमोल यांना 'कुठ आहे, बर ते लबाणगुडयाच फाईल काय झाल ते बघायच आहे, दंड माफीच, दुसरा लबाणगुडा एक आहे दोन आहे माझ्याकडे' असे अमोल यांना म्हणालो. त्यावर अमोल यांनी 'दोन लबाणगुडा आहे, मी तेच तर म्हणलो साल, मी लबाणगुडा टाकलो त्या दिवशी' असे मला म्हणाले त्यावर मी 'काही नाही साहेबांना आता भेटतो, आता पैसे आले आहे बघु आता' असे अमोल यांना म्हणालो.

त्यानंतर काही वेळ मी गुंडावार यांचेसोबत व अमोल यांचेसोबत बोलून नंतर काही वेळाने मी पंच क्र. 1 यांचेसह बोहरे साहेब यांचे कक्षामध्ये गेलो असता कक्षात गेल्यानंतर मी पंच क्र. 1 यांना समोरील खुर्चीवर बसलेली व्यक्ती हे गैर अर्जदार बोहरे, कार्यकारी अभियंता असल्याचे हळुच ईशा-याने सांगितले. त्यानंतर मी बोहरे साहेब यांना 'साहेब लभानगुडयाचं एक बिल होतं' असे म्हणालो असता त्यावर बोहरे यांनी 'नंतर, आठ दिवसा नंतर' असे मला म्हणाले. त्यावर मी त्यांना 'आठ दिवस झाले साहेब' असे म्हणालो. त्यावर बोहरे यांनी 'नंतर, ठिक आहे, असे मला म्हणून पंच क्र. 1 यांचेकडे बघून 'साहेब तुमच काय आहे'. असे म्हणाले. तेव्हा मी बोहरे साहेब यांना 'माझ्या सोबत आले ते, ह्यांच काम नाही आहे.' असे म्हणून 'बिल बी आहे त्याच्यामध्ये' असे म्हणालो. त्यावर बोहरे यांनी 'बिल नाही आहे. त्यामध्ये माफीच आहे, तु दहा पंधरा दिवसानी ये, दंड माफी' असे मला म्हणाले. त्यावर मी त्यांना 'ठिक आहे, काटुन बिल टाकुन देतो मी साहेब, काटुन बिल टाकुन देतो मी, काय करणार आहे' असे म्हणालो. त्यावर बोहरे यांनी 'तुला जे योग्य वाटते ते कर, दंड माफी नंतर होणार, तुझ काम झाल आहे का आता' असे मला म्हणाले. त्यावर मी बोहरे साहेब यांना 'पंधरा दिवस झाले साहेब, दहा पंधरा दिवस झाले, इथ पडुन आहे.' असे म्हणालो. त्यावर बोहरे साहेब यांनी 'देतो जा नंतर, नंतर पाच दहा मिनीटात, तुझ बिल पाहीजे असेल तर बिल घे, नाहीतर दंड माफीवाफी नाही होणार' असे मला म्हणाले त्यानंतर मी पंच क्र. 1 सह बोहरे यांचे कक्षातून बाहेर येवून हजर असलेल्या अमोल यांना 'दंड कापुन हे बिल देवुन द्या' असे म्हणालो. त्यावर अमोल यांनी मला ' दंड कापा म्हणे' असे म्हणाले. तेव्हा त्यावर मी 'हो नंतर कापून टाका. काही होत नाही' असे म्हणाले. त्यावर गुंडावार यांनी 'देवून दे. कोणते बिल काढायचे राहीले.' असे मला म्हणाले असता मी त्यांना 'तुमच्याकडे एक आहे, लबाणगुडा एक आहे' असे म्हणालो. त्यावर गुंडावार यांनी 'ते तर होणारच आहे लबाणगुडा' असे म्हणाले. त्यावर मी टेबलावर असलेल्या फाईलकडे बोट दाखवीत गुंडावार यांना 'हे काय येरमी येसापूर एक आहे' असे म्हणालो.

त्यानंतर गुंडावार यांनी बोहरे साहेबांशी ‘बोलतो मी’ असे मला म्हणाले. त्यावर मी ‘कधी’ असे विचारले असता गुंडावार यांनी ‘संध्याकाळी ‘ असे मला सांगितले. त्यावर मी गुंडावार यांना बोहरे साहेबांकडे ‘मला घेवुन जा’ असे म्हणालो असता त्यांनी होकार दिला. तेव्हा मी त्यांना ‘किती वाजता येवु मग’ असे विचारले असता गुंडावार यांनी ‘सात वाजता’ असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे दोघेही माझे चारचाकी वाहनाने ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथे परत आलो. त्यानंतर लाचरक्कम मागणीबाबतची पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत प्रमाणपत्राचे मी, पंच क्र. 01, पंच क्र. 2 व भोसले मॅडम नी वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले.

त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.

त्यानंतर भोसले मॅडम यांनी आम्हास विचारपुस करुन संभाषणाची रेकॉर्डेड फाईल ऐकली असता सुशील गुंडावार यांनी मला बोहरे साहेबांशी बोलुन घ्या असे म्हणाल्यावरून मी गैरअर्जदार बोहरे कार्यकारी अभियंता यांचेकडे त्यांचे कक्षात जावून भेटलो असता त्यांनी मला ‘तुझे सगळे बिल, दोन होते दोन्ही केले मी, आता एकही इकड नाही आहे माझ्याकडे, माझ्याकडे माझ्याकडे नाही आहे, तुझे दोन होते न, त्यादिवशी करून दिले न मी तुझे दोन्ही. असे म्हणून ‘तुम्ही 10-15 दिवसानी ये, दंड माफीसाठी.’ असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांचे कक्षातून परत येत असतांना गैरअर्जदार सुशील गुंडावार हे मला भेटले व म्हणाले की, ‘तुम्ही मला संध्याकाळी 07:00 वा. भेटा. मी तुमची बोहरे साहेबांशी भेट करून देवून तुमचा काम करून देतो’ असे दिसुन आले.

त्यानंतर भोसले मॅडम यांनी मला पडताळणी कारवाई दरम्यान संभाषणामध्ये बोहरे यांनी आपणास ‘दहा पंधरा दिवसांनी या दंड माफ होणार नाही’ असा उल्लेख केलेला आहे. तरी आपणाकडून कोणत्या कारणास्तव दंड वसूल करण्यात येत आहे असे विचारून संबंधीत कागदपत्रांबाबत विचारणा केली असता त्यांना सांगीतलो की, मी लभानगुडा येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे बांधकाम संथगतीने होत असल्याने उपविभागीय अभियंता, उपविभाग जिवती यांनी 357 रूपये प्रतीदिन दंड ठोठावला होता, तो दंड माफ होणेकरिता मी ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर येथे अर्ज केलेला आहे. परंतु अजुनपर्यंत त्या अर्जावर कार्यकारी अभियंता बोहरे यांनी अजुनपर्यंत कार्यवाही केलेली नाही. सदरबाबत कागदपत्रे नसल्याचे सांगीतले. त्यानंतर भोसले मॅडम यांनी मला म्हणाल्या की तुम्ही संभाषणामध्ये अमोल या व्यक्तीशी बोलत आहात, तर ती व्यक्ती कोण आहे व सदर व्यक्तीविरूध्द आपली तक्रार आहे किंवा कसे? असे मला विचारल्या. त्यावरून मी त्यांना सांगीतलो की, श्री. अमोल हे बोहरे साहेब यांचे कार्यालयात ऑडीटर असुन त्यांचेकडेच माझी लभानगुडा येथील दंडाची व बिलाची फाईल आहे, त्यामुळे मी सदर फाईल काढण्याकरीता अमोल यांचेशी बोललो आहे, त्यांनी माझेकडून कोणत्याही प्रकारे लाचेची मागणी केलेली नाही व माझी अमोल यांचेविरूध्द तक्रार नाही.

यावरून भोसले मॅडम यांनी मी व पंच यांनी सांगीतल्यानुसार व त्यांनी ऐकलेल्या संभाषणानुसार गुंडावार यांनी आज रोजी संध्याकाळी 07/00 वा. चे दरम्यान मला भेटण्यास सांगून बोहरे सांहेबांची भेट करून देणार असल्याचे स्पष्ट मत होत आहे. त्यावरून मला व पंच क्र. 01 श्री. शेखर पाटील

यांचेसोबत संध्याकाळी 07/00 वा. ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय, जिल्हा परिषद चंद्रपूर येथे पुन्हा गैरअर्जदार श्री. सुशील गुंडावार वरिष्ठ सहायक व श्री. बोहरे कार्यकारी अभियंता यांचेकडे पडताळणी कारवाई करिता पाठविण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर पंचासमक्ष गैरअर्जदार श्री. बोहरे कार्यकारी अभियंता, आणि वरिष्ठ सहायक श्री. सुशील गुंडावार यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगुन भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी परत पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.

पडताळणी कार्यवाहीच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्यानंतर भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी याआधी वापरण्यात आलेले मेमरीकार्ड हे व्हाईस रेकॉर्डरमध्ये असुन सदर मेमरीकार्डमध्येच परत पडताळणी कार्यवाहीचे संभाषण रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगुन व्हाईस रेकॉर्डर सुरू केले. व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पडताळणी कार्यवाहीची एक फाईल असुन त्याव्यतिरीक्त व्हाईस रेकार्डरमध्ये इतर कोणतीही फाइल नसल्याची खात्री केली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांचेसोबत पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे भोसले मॅडम, मी, पंच क्र. 1 व पंच क्र. 2 नी वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझ्या गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर माझे चारचाकी वाहनाने पंच क्र. 01 यांचेसह ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथून ग्रामीण पाणीपुरठा कार्यालय, जिल्हा परिषद चंद्रपूर येथे पडताळणी करीता संध्याकाळी अंदाजे 06/50 वा. दरम्यान पाठविले. मी व पंच क्र. 1 सोबत जिल्हा परिषद चंद्रपूर येथे गेलो. तेथे बाहेरच माझे चारचाकी वाहन पार्क करून पंचासह ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयात गेलो असता तिथे गुंडावार हे त्यांचे टेबलावर बसुन नसल्याचे दिसले. तेव्हा मी बाजुच्या टेबलवर बसुन असलेल्या ऑडीटर अमोल यांना गुंडावार यांचेबाबत विचारणा केली असता त्यांनी आतमध्ये बसुन होते असे सांगीतले. त्यानंतर मी बाजुला बसलेल्या अनिकेत यांना बोहरे साहेब व सुशील गुंडावार हे कुठे गेले असे विचारपूस केली असता तेव्हा अनिकेत यांनी सांगीतले की, बोहरे साहेब हे घरी गेले असल्यामुळे सुशील भाऊ सुध्दा त्यांचे घरी सहया साठी गेले असल्याचे सांगीतले. काही वेळानंतर गुंडावार हे बोहरे साहेब यांचेकडून येवून त्यांचे टेबलावर बसले असता मी त्यांच्याकडे जावून 'सहया झाल्या, साहेब येणार आहेत, बोललो असतो साहबांना' असे विचारले असता गुंडावार यांनी 'साहेब येणार नं' असे म्हणाले. त्यानंतर मी बोहरे साहेबांशी बोलण करून देण्याबाबत गुंडावार यांना 'बोलुन घेतलो असतो नं आपण, ते दंड कमी करून, आणखी डबल डबल आहे की नाही, उद्या मुलाचा पेपर आहे' असे सांगुन माझा मुलगा उद्याला पेपरसाठी बाहेरगावी जाणार आहे तरी आज साहेबांशी बोलण करून दिले असते तर बर झालं असत असे म्हणालो. त्यानंतर मी गुंडावार यांना 'सुशिल भाऊ माझे काहीतरी निपटवां नं, हे दोन फाईली आहे न भाऊ माझ्या, हे काय येरमी येसापुर अन तेथे लभानगुडा आहे.' त्यावर गुंडावार यांनी 'काय करता येईल पाहु.' त्यावर मी 'कधी, आज संध्याकाळी बोलुन दिलं असतं बर झालं असतं अ, फाईली जात आहे. सीओ कडे सहयासाठी, सीओ साहेबांकडे जात आहे फाईली' असे म्हणालो. त्यानंतर मी गुंडावार यांना फाईल काढुन देण्यास सांगीतले असता

त्यांनी 'काढून देतो नं उदया' असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे दोघेही माझे चारचाकी वाहनाने ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथे परत आलो. त्यानंतर लाचरक्कम मागणीबाबतची पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत प्रमाणपत्राचे मी, पंच क्र. 01, पंच क्र. 2 व भोसले मॅडम नी वाचन केल्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आले. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली. त्यानंतर भोसले मॅडम यांनी आम्हास विचारपुस करुन संभाषणाची रेकॉर्डेड फाईल ऐकली असता माझ्या येरमी येसापूर व लभानगुडा च्या दोन फाईलीचे बील काढुन देण्यासाठी गुंडावार यांचेशी बोलणी करून बोहरे साहेब यांचेशी लभानगुडा येथील दंड माफ करून बिल काढुन देण्याकरीता बोलण करून देण्यासाठी विचारणा केली असता गुंडावार यांनी उदया काढुन देता म्हणाल्याचे असे दिसुन आले. गुंडावार व बोहरे साहेब यांनी उद्याला बोलाविल्याणे भोसले मॅडम यांनी मला व पंच क्र. 1 यांना त्यांचेकडे पाठवून परत पडताळणी कार्यवाही करणार असल्याचे सांगीतले. त्यावर मी भोसले मॅडम यांना उद्याला माझे मुलाचे पेपर असल्याने मुलाला बाहेरगावी घेवून मला जायचे असल्याने पुढील कारवाई ही दिनांक 09/04/2025 रोजी दुपारी 02/00 वा. नंतर करण्याबाबत दोन्ही पंचासमक्ष विनंती केली.

त्यानुसार भोसले मॅडम यांनी दिनांक 09/04/2025 रोजी पुन्हा ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय, जिल्हा परिषद चंद्रपूर येथे मला व पंच क्र. 1 यांचेसह श्री. बोहरे कार्यकारी अभियंता आणि श्री. सुशील गुंडावार वरिष्ठ सहायक यांचेकडे पडताळणी कारवाई करिता दुपारी 02/00 वा. नंतर पाठविण्याचा निर्णय घेतला. तसेच दोन्ही पंच आणि तक्रारदार व सापळा कारवाईतील कर्मचारी यांना सदर कारवाई बाबत संपूर्णत: गोपनियता बाळगण्याच्या सूचना देवून कार्यालयीन स्टाफला ला.प्र.वि. कार्यालयातच हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले.(याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा क्र. 2 भोसले मॅडम यांनी तयार केला.)

दि. 09/04/2025 रोजी दुपारी 02/30 वा. दरम्यान मी माझे चारचाकी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर येथे आलो. भोसले मॅडम, दोन्ही पंच व सापळा सदस्य हे कार्यालयात आधीच हजर होते. त्यानंतर भोसले मॅडम यांनी मला श्री. बोहरे कार्यकारी अभियंता, आणि वरिष्ठ सहायक श्री. सुशील गुंडावार हे कार्यालयात हजर आहेत किंवा कसे याबाबत विचारले असता मी त्यांना सांगीतले की, ते दोघेही यावेळी जिल्हा परिषद चंद्रपूर येथील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयात हजर असल्याचे सांगितले. त्यानंतर पंचासमक्ष श्री. बोहरे कार्यकारी अभियंता, आणि वरिष्ठ सहायक श्री. सुशील गुंडावार यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगुन भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.

पडताळणी कार्यवाहीच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्यानंतर भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये

नविन मेमरी कार्ड टाकले व व्हाईस रेकार्डरमध्ये कोणतीही फाइल नसल्याची खात्री केली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांचेसोबत पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे भोसले मॅडम, मी, पंच क्र. 1 व पंच क्र. 2 नी वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझ्या गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर माझे चारचाकी वाहन क्र. एम.एच.31 एफ.ए 8874 नी पंच क्र. 01 यांचेसह ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथून ग्रामीण पाणीपुरठा कार्यालय, जिल्हा परिषद चंद्रपूर येथे पडताळणी करीता दुपारी अंदाजे 03/20 वा. दरम्यान पाठविले. मी व पंच क्र. 1 सोबत जिल्हा परिषद चंद्रपूर येथे गेलो. तेथे बाहेरच माझे चारचाकी वाहन पार्क करून पंचासह ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयात गेलो असता तिथे गुंडावार हे त्यांचे टेबलावर बसुन होते. मी गुंडावार यांचे जवळ जावून माझ्या कामाचे बिलाबाबत त्यांचेशी बोलत असतांना गुंडावार यांनी 'मी का म्हणलो, तु काहो का देतो म्हणला होतास न, दोन-चार दिवसान' असे म्हणाले असता मी त्यांना 'देतो हो, काय कुठ जाणार आहे, हे झाल की काय त्याला, समद्यांच देणही होवुन जाते, मोकळं होवुन जाते, हाय की नाही' असे म्हणालो. त्यानंतर मी बोहरे साहेबाला गुंडावार यांना विचारपूस केली असता त्यांनी 'साहेब येतील न अध्र्या तासात' असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना 'साहेबांशी बोलण करून द्या' असे म्हणुन 'ते काय आहे तर, इकड ऐका, मागच काय आहे तर देवुन टाकते म्हणा, ते दोन बिल द्या म्हणा' असे म्हणालो असता गुंडावार यांनी होकार दिला. तेव्हा मी त्यांना 'माझी फाईल घ्यान सुशिलभाऊ येरणी येसापूर' असे म्हणुन माझे बिल काढून मागीतले. त्यावर गुंडावार यांनी 'आगा तु थांब गा बाबा, मज मले माहित राहते' असे म्हणुन मला थांबण्यास सांगीतले. त्यानंतर मी 'पाच महिन्यापासुन माझे बिल आहेत न भाऊ इथ, पाच मिनीट वेळ तर काढा फक्त. हो हो साहेब एकटे बसुन आहेत चला हो, चला सुशिलभाऊ, चला न सुशिलभाऊ' असे म्हणालो असता गुंडावार यांनी 'मला काम करू दे' म्हणाले. त्यानंतर मी लिंगणडोहची फाईलबद्दल विचारणा करून साहेबांकडे सोबत मला घेवून जाण्याबाबत बोललो असता 'अरे उठील तर काम कस होईल' असे म्हणाले. त्यानंतर काही वेळाने गुंडावार हे बोहरे साहेब यांचेकडे जावून परत आले. तेव्हा मी गुंडावार यांना बोहरे यांचेशी माझ्या बिलाबाबत बोलण झाले काय असे विचारले असता त्यांनी 'हो, बोललो, संध्याकाळी बोलु म्हणे' असे सांगीतले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे दोघेही माझे चारचाकी वाहनाने ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथे परत आलो. त्यानंतर लाचरक्कम मागणीबाबतची पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत प्रमाणपत्राचे मी, पंच क्र. 01, पंच क्र. 2 व भोसले मॅडम नी वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.

त्यानंतर भोसले मॅडम यांनी आम्हास विचारपुस करुन संभाषणाची रेकॉर्डेड फाईल ऐकली असता सुशील गुंडवार यांनी मला मागील बिले काढून दिल्याबद्दल माझेकडून पैशाची मागणी केली, तेव्हा मी त्यांना होकार देवून आधी पेंडीग बिल काढुन द्या असे म्हणुन हे बिल काढण्यासाठी बोहरे यांचेशी बोलण करून देण्याबाबत म्हणालो असता त्यांनी मला काम करू दे असे म्हणाले. त्यानंतर काही वेळाने गुंडावार हे एकटेच बोहरे यांचे कक्षात जावून आले. तेव्हा मी त्यांना बोहरे साहेबांना

माझ्या कामाबद्दल बोलले काय असे विचारले असता त्यांनी ‘हो बोललो, संध्याकाळी बोलू म्हणे’ असे मला सांगितल्याचे दिसुन येत आहे.

त्यानंतर भोसले मॅडम यांनी मला पडताळणी कारवाई दरम्यान संभाषणामध्ये एक व्यक्ती आपल्याला काय दारू प्यायची, एकवेळ दारू गिरू पाज मग मले असे बोलत आहे. तर ती व्यक्ती कोण आहे व सदर व्यक्तींने आपणाकडे प्रलंबीत कामासाठी दारू पाज असे म्हणत आहेत काय तसेच त्या व्यक्तीविरूध्द आपली तक्रार आहे किंवा कसे? असे मला विचारले. त्यावरून मी त्यांना सांगीतले की, सदरची व्यक्ती हे अजय रामटेके असुन ते डिसेंबर/2024 मध्ये सेवानिवृत्त झालेले आहे. ते त्यांच्याकामानिमीत्य आलेले होते, त्यांचेशी माझे मैत्रीपुर्ण संबंध असुन आम्ही अधेमधे बार/रेस्टॉरंटमध्ये जेवण व दारू घेत असतो. त्यांचेकडे माझे कोणतेही प्रलंबीत काम नाही व त्यांनी प्रलंबीत कामासाठी माझेकडून दारू पाजण्यास म्हटले नाही. तसेच माझी अजय रामटेके यांचेविरूध्द तक्रार नाही.

यावरून भोसले मॅडम यांनी मी व पंच यांनी सांगीतल्यानुसार व त्यांनी ऐकलेल्या संभाषणानुसार गुंडावार यांनी आज रोजी संध्याकाळचे दरम्यान मला भेटण्यास सांगून बोहरे सांहेबांची भेट करून देणार असल्याचे स्पष्ट मत होत आहे. त्यावरून मला पंच क्र. 01 श्री. शेखर पाटील यांचेसोबत संध्याकाळी 07/00 वा. ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय, जिल्हा परिषद चंद्रपूर येथे पुन्हा श्री. सुशील गुंडावार वरिष्ठ सहायक व श्री. बोहरे कार्यकारी अभियंता यांचेकडे पडताळणी कारवाई करिता पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पंचासमक्ष श्री. बोहरे कार्यकारी अभियंता, आणि वरिष्ठ सहायक श्री. सुशील गुंडावार यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगुन भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी परत पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.

पडताळणी कार्यवाहीच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्यानंतर भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी याआधी वापरण्यात आलेले मेमरीकार्ड हे व्हाईस रेकॉर्डरमध्ये असुन सदर मेमरीकार्डमध्येच परत पडताळणी कार्यवाहीचे संभाषण रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू केले. व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पडताळणी कार्यवाहीची एक फाईल असुन त्याव्यतिरीक्त व्हाईस रेकार्डरमध्ये इतर कोणतीही फाइल नसल्याची खात्री केली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांचेसोबत पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे भोसले मॅडम, मी, पंच क्र. 1 व पंच क्र. 2 नी वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझ्या गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले.

त्यानंतर माझे चारचाकी वाहन क्र. एम.एच.31 एफ.ए 8874 नी पंच क्र. 01 यांचेसह ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथून ग्रामीण पाणीपुरठा कार्यालय, जिल्हा परिषद चंद्रपूर येथे पडताळणी करीता संध्याकाळी अंदाजे 06/51 वा. दरम्यान पाठविले. मी व पंच क्र. 1 सोबत जिल्हा परिषद चंद्रपूर येथे गेलो. तेथे बाहेरच माझे चारचाकी वाहन पार्क करून पंचासह ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयात गेलो असता तिथे गुंडावार हे त्यांचे टेबलावर बसुन नसल्याचे दिसले. तेव्हा मी बोहरे यांचे कक्षाचे बाहेर

उभ्या असलेल्या चपराशी यांना आत जाण्यास विचारणा करून बोहरे यांचे कक्षात जावू लागलो, तेव्हा चपराशी यांनी त्याच्या उजव्या हाताचा पंजा उभा करून पंच क्र. 1 यांना बाहेरच थांबण्याचा इशारा केला. तेव्हा मी बोहरे साहेब यांचे कक्षात गेलो. कक्षामध्ये चेअरवर बसुन असलेल्या बोहरे साहेबांना माझी फाईल काढून टाकण्याबाबत बोललो असता त्यांनी 'तु संबंध ठेवत नाही व्यवस्थीत, सगळयासोबत. त्याला काय करणार आहे यार' असे म्हणाले. तेव्हा मी 'ठेवतो ओ साहेब' असे म्हणुन 'नाही साहेब पैसे नव्हते म्हणुन मी, एक दिलं होत सुशीलभाऊकडे, करून देतो नाही का, उदया परवामध्ये करून देतो साहेब, पुर्ण करून देतो' असे म्हणालो. त्यानंतर मी बोहरे यांना 'मी सहा सात महिणे झाले दंड माफिसाठी बसलो आहे साहेब, आठ महिणे झाले जवळपास,म्हणजे सहाव्या महिण्यामध्ये बिल आणलेले आहे' त्यावर त्यांनी 'पंधरा दिवसांपासून फक्त दंड माफिची माझेकडे फाईल आहे' असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना 'दहा महिणे झाले' असे म्हणालो. त्यावर त्यांनी 'लहू आधी, आधी यायला पाहिजे होतं. तेव्हा मी विषय संपवला असता. ' असे म्हणाले. त्यानंतर मी येलापूर येथील पाईपलाईनच्या कामाबददल बोलणी केली. त्यानंतर मी बोहरे साहेब यांना 'दोन फाईली काढून द्या नं' असे म्हणाले असता त्यावर त्यांनी 'एक बिल करायला लावतो मी, ठिक आहे.' त्यावर मी 'परत दिले पैसे तुम्ही, त्या दिवशी सुशिल भाऊला, असं नसायला पाहीजे न साहेब, आता पर्यंत व्यवहार मी केलाच आहे साहेब, कधीतरी काही आलं का काही अडचण' असे म्हणालो. त्यानंतर बोहरे साहेब यांना 'हो ते देतो साहेब, मागले देवुन देतो, मागचे तीन, आता माग त्रेचाळीस बिल उचलले त्याचे एक, चार आणी टंचाईचे, टंचाईचे किती आहे, टंचाईचे किती परसेंट द्यायचे आहे साहेब, एक म्हणत आहे सुशिल भाऊ' असे म्हणालो. त्यावर त्यांनी 'त्याचे वेगळे द्यायचेचं आहे त्याला' असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना 'एक परसेंट, ते देवुन देतो पुर्ण, उद्या किंवा परवा करतो माझ्या दोन फाईली काढायला लावा सुशिलभाऊला' असे म्हणालो. त्यावर त्यांनी 'माझे तु आधी क्लिअर कर नंतरच मी बोलणार' असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना 'उद्या देवुन देतो साहेब सुशिलभाऊकडे' असे म्हणालो. तेव्हा त्यांनी 'किती किती शिल्लक आहे आपले' असे म्हणाले असता मी 'मागचे तीन आणि त्रेचाळीस उचलले आहे त्याचे एक, चार आणि टंचाईचे वीस' असे म्हणालो. त्यानंतर बोहरे यांनी मला 'टंचाईचे किती लाखाचे काम आहे.' त्यावर मी 'परमा विस लाखाचं आहे, आणि बिलोझान चौदा लाखांचं आहे' असे म्हणालो असता. त्यांनी मला 'चौदा, चौदाचं किती करणार तु' असे विचारले असता मी त्यांना 'वीस म्हणत आहे, चौदा करून टाकतो.' असे म्हणालो. त्यानंतर त्यांनी 'नाही नाही माझे किती करणार आहे.' असे मला म्हणाले. तेव्ह मी त्यांना 'तुमचे चार' असे म्हणालो. त्यावर त्यांनी 'हं ते तर आलं लक्षात' असे म्हणालो. त्यावर मी त्यांना 'ते मग नंतर बिलावर देवु न साहेब, ते बिलस बिल आणु आणु तेव्हा देवु नं,' असे म्हणालो. त्यानंतर मी अमोल यांचेशी लभानगुडा येथील दंडाची फाईल बाबत बोलणी करून काही वेळाने पुन्हा सुशील गुंडावार यांना 'सुशीलभाऊ मायी फाईल, साहेब माझी फाईल काढून दया हो येरमी येसापुर, दाहा लाखांची आहे' तेव्हा बोहरे साहेब हे त्यांचे कक्षाबाहेर येवून 'याची, याचं एक काढ, छोटवालस काढ याचं, एक याचं काढ' त्यावर मी 'लभानगुडयांच एक कराले लावा नं साहेब' म्हणालो तेव्हा बोहरे साहेब ' पैसे संपले ते, संपले पैसे आता' असे म्हणून कार्यालयाबाहेर गेले. त्यानंतर मी गुंडावार यांना 'साहेबांना बोललो. साहेब म्हणल अस का सुशील भाउ करते.. हे करत आहे. परत देत आहे म्हणलं पैसे. उदया देवून देतो म्हणल, ते टंचाईचे वीस, साहेबांचे तीन नं.. एक चार वीस, ठिक आहे मंग ' असे म्हणालो.

त्यावर गुंडावार यांनी होकार दिला. तेव्हा मी ‘उदया घेवून येतो. पण माझी आता किती वाजेपर्यंत काढाल फाईल’ असे म्हणून निघून आलो.

त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे दोघेही माझे चारचाकी वाहनाने ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथे परत आलो. त्यानंतर लाचरक्कम मागणीबाबतची पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत प्रमाणपत्राचे मी, पंच क्र. 01, पंच क्र. 2 व भोसले मॅडम नी वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.

त्यानंतर भोसले मॅडम यांनी आम्हास विचारपुस करुन संभाषणाची रेकॉर्डेड फाईल ऐकली असता बोहरे यांनी मला मागचे तीन लाख व आता त्रेच्याळीस लाखाचे बिल उचलले त्याचे एक लाख असे एकुण चार लाख व गुंडावार यांचे टंचाईचे वीस हजर असे एकुण 4 लाख 20 हजार रू. मागणी केली आहे. तसेच सदरची लाच रक्कम मी गुंडावार यांना उद्या आणुन देतो असे म्हणाले असता गुंडावार यांनी स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

त्यानुसार भोसले मॅडम यांनी पंचासमक्ष मला म्हणाल्या की, उदया दिनांक 10/04/2025 रोजी गैरअर्जदार यांनी आपणास लाच रक्कम घेवून येण्यास सांगीतले आहे, परंतु उद्याला शासकीय सुट्टी असल्याने दोन्ही गैरअर्जदार हे कार्यालयात हजर असतील काय असे विचारले असता मी त्यांना सांगीतले की, शासनाला फंड परत जाणार असल्याने दोन्ही गैरअर्जदार हे उद्याला कार्यालयात हजर असुन ते दिवसभर कामात व्यस्त असल्याने त्यांना सायंकाळी 07/00 वा. नंतर भेटायला जाणे योग्य होणार आहे असे सांगीतले. तेव्हा भोसले मॅडम व दोन्ही पंचानी ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय, जिल्हा परिषद चंद्रपूर येथे मला, पंच क्र. 1 यांचेसह बोहरे साहेब आणि गुंडावार यांचेकडे सापळा कारवाई करिता पाठविण्याचा निर्णय घेतला. दोन्ही पंच, सापळा कारवाईतील कर्मचारी व मला सदर कारवाई बाबत संपूर्णत: गोपनियता बाळगण्याच्या सूचना देवून मला व दोन्ही पंचांना दिनांक 10/04/2025 रोजी सायंकाळी 07/00 वा. लाप्रवि कार्यालय चंद्रपूर येथे हजर राहण्याबाबत सूचना दिल्या. तसेच कार्यालयीन स्टाफला ला.प्र.वि. कार्यालयातच कार्यालयीन वेळेत हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले.(याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा क्र. 3 भोसले मॅडम यांनी तयार केला आहे.)

दि. 10/04/2025 रोजी सकाळी 08/45 वा. व दुपारी 12/40 वा. दरम्यान भोसले मॅडम यांना माझे मोबाईलवरून फोन करून माझे घरी पाहुणे येणार असल्याचे सांगुन सध्याकाळी थोडा उशीर होवू शकतो असे सांगितले. त्यानुसार मी संध्याकाळी अंदाजे 07/10 वा. चे दरम्यान लाप्रवि कार्यालय चंद्रपूर येथे हजर आलो. तेव्हा भोसले मॅडम व दोन्ही पंच ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथे आधीच हजर होते. त्यानंतर भोसले मॅडम यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबात परत एकदा सर्वांना समजावून सांगितले. दि. 09/04/2025 रोजी बोहरे यांनी माझेकडून 4 लाख रूपयाची मागणी करून गुंडावार यांचेकडे देण्यास सांगीतले आहे. तसेच गुंडावार यांनी सुध्दा मला 20 हजाराची मागणी करून बोहरे यांचे 4 लाख रूपये व त्यांचे 20 हजार रूपये असे एकुण 4,20,000/- रूपये स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबत सांगितले.

त्यानंतर भोसले मॅडम यांनी मला बोहरे साहेब आणि गुंडावार हे कार्यालयात हजर मिळतील किंवा कसे याबाबत विचारले असता मी त्यांना सांगीतले की, दोघांनाही पाणी पुरवठा योजनेची बिले पी.ए.एम.एस. प्रणालीच्या मार्फतीने ठेकेरांना वाटप करणे असल्याने ते दोघेही यावेळी जिल्हा परिषद चंद्रपूर येथील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयात हजर असण्याची शक्यता असल्याचे सांगितले. परंतु भोसले मॅडम यांनी गुंडावार यांना माझे मोबाईलवरून फोन लावून फोन स्पीकर मोडवर ठेवून लाच रक्कम स्विकारणी बाबत वेळ व स्थान निश्चीत करण्याकरिता बोलणी करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

बोहरे साहेब यांनी माझेकडून 4 लाख रूपयाची मागणी करून गुंडावार यांचेकडे देण्यास सांगीतले आहे. तसेच गुंडावार यांनी सुध्दा मला 20 हजाराची मागणी करून बोहरे साहेब यांचे 4 लाख रूपये व त्यांचे 20 हजार रूपये असे एकुण 4,20,000/- रूपये स्विकारण्याची तयारी दर्शविली आहे. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सूचनेवरून एका कार्यालयीन कर्मचारी यांनी मी तक्रार देतेवेळी जमा केलेल्या अँथ्रासिन पावडर लावून असलेल्या लाच रकमेच्या नोटांचे बंडल असलेल्या लिफाफ्यातून 4,20,000/- रूपये काढून एका कापडी पिशवीत ठेवली. सदर कापडी पिशवी ही सापळा कारवाई करिता जातेवेळी माझे चारचाकी वाहनात सुरक्षीत ठेवून सोबत घेवून जाण्याची सूचना देण्यात आली. त्यानंतर गैरअर्जदार बोहरे किंवा गैरअर्जदार गुंडावार यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर दर्शनी भागावर येवून माझे पॅन्टचे समोरील डावे बाजुच्या खिशातून डाव्या हाताने रूमाल काढून आपला चेहरा पुसून डाव्या हातातच रूमाल ठेवण्याबाबतचा ईशारा करण्याबाबत मला सांगितले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य ईशारा मिळतातच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.

त्यानंतर भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन मेमरी कार्ड व व्हाईस रेकार्डरमध्ये कोणतीही फाइल नसल्याची खात्री केली. त्यानंतर भोसले मॅडम यांचे तसेच पंच क्र.1, पंच क्र..2 आणि माझे आवाजात प्रमाणपत्राचे वाचन करून व्हॉईस रेकॉर्डर सुरू असतांना मी माझे मोबाईल क्रमांक 7030319601 वरून गुंडावार यांचे मोबाईल क्र. 7972560609 यावर 21/07 वा. दरम्यान फोन करून फोन स्पिकर मोडवर ठेऊन बोलणी केली असता. मी गुंडावार यांना 'कुठे आहेस सुशील भाऊ, तुमचे विस हजार रूपये असे चार लाख वीस हजार रूपये घेवून जवळपास आलो होतो बल्लारशाहाच्या' असे म्हणालो असता त्यावर त्यांनी 'दिवसभर ऑफिसलास होतो मी' असे म्हणाले. त्यावर 'काही जुगाड जमलं नाही न इकडून तिकडून जमवलं नाही का' असे म्हणालो असता त्यावर गुंडावार यांनी 'आला का कोठं आहे, येनं, ये मी सरांना फोन करून देतो' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 'सरांना, हो तेच तुच्याकडे देवून दे म्हणे' असे म्हणालो तेव्हा त्यावर त्यांनी 'ठिक आहे' असे म्हणाले असता मी त्यांना 'कुठे येवू भाऊ' असे विचारले. त्यावर त्यांनी मला 'ऑफिसला येनं मी ऑफिसलास आहो' असे मला सांगितले. तेव्हा मी त्यांना 'आता कुणी असतील ऑफिसमध्ये, तुम्ही ,खाली येवून जाल, नाही का फोन लावतो' असे म्हणलो असता त्यावर त्यांनी 'खाली, खालीच आहो. कोणीच नाही आहे ऑफिसमध्ये,मी एकटाच आहे बाकी सगळे नाश्ता, पाणी जेवायला गेले' असल्याचे मला गुंडावार यांनी सातिगतले. तेव्हा मी त्यांना 'चालते न भाऊ, ठिक आहे, ठिक आहे, येतो दहा पंधरा मिनिटांत हो' असे म्हणून मोबाईल फोन ठेवून दिला. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सूचनेवरून व्हॉईस रेकॉर्डर बंद

करण्यात आले. यावरून गुंडावार यांनी मला बोहरे साहेबांचे 4 लाख रू. व स्वत:चे 20 हजार रू. असे एकूण 4 लाख 20 हजार रूपये जिल्हा परिषद कार्यालय चंद्रपूर येथे घेवून बोलाविल्याचे निष्पन्न झाल्याने पुढील सापळा कारवाई जिल्हा परिषद येथे करण्याचा भोसले मॅडम यांनी निर्णय घेतला. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी सापळापुर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.

त्यानंतर भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर 21/56 वा. सुरू करून व्हाईस रेकॉर्डरमधील मेमोरी कार्डमध्ये यापूर्वी गुंडावार यांचेसोबत मोबाईलवर बोलणी केल्याबाबतचे संभाषणाची जतन झालेली फाईल असल्याबाबत खात्री केली. त्यांनतर त्याच मेमोरी कार्डमध्ये सापळा कारवाई दरम्यानचे संभाषण रेकॉर्ड होणार असल्याचे दोन्ही पंच व मला सांगण्यात आले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांचेसोबत सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे भोसले मॅडम, मी, पंच क्र. 1 व पंच क्र. 2 नी वाचन करुन भोसले मॅडम यांचे सूचनेवरून पो.हवा. रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझ्या गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर माझे चारचाकी वाहन क्र. एम.एच.31 एफ.ए 8874 नी पंच क्र. 01 यांचेसह ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथून ग्रामीण पाणीपुरठा कार्यालय, जिल्हा परिषद चंद्रपूर येथे सापळा करीता संध्याकाळी अंदाजे 21/58 वा. दरम्यान पाठविले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकीय वाहनाने रवाना झाले. मी पंचासह जिल्हा परिषद चंद्रपूर येथील येथील मेन गेटचे जवळ पोहचलो असता बोहरे साहेब यांचा शिपाई मतीन यांचा मला फोन येत होता परंतु तो फोन मी उचचला नाही. मी जिल्हा परिषद चंद्रपूर येथील मेन गेटचे आत पंचासह माझे चारचाकी वाहनाने पोहचल्यानंतर ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयाचे खाली माझे वाहन थांबविले असता भोसले मॅडम यांनी त्यांचे वाहन लाबंच थांबवून वाहनातुन उतरून सापळा पथकातील भोसले मॅडम व सदस्यही आमचे आजुबाजुला मला दिसणार अशा रितीने थांबलेले असल्याचे मला दिसत होते. त्याच वेळी गुंडावार यांचा मला फोन आला व त्यांनी मला ‘कोठ पर्यंत आला’ असे विचारले त्यावर मी गुंडावार यांना ‘आलो आफिसला थोडा उशीर झाला थोडं, एक दोघांचे फोन आले बाबा’ असे म्हणालो. त्यावर गुंडावार यांनी मला वरती येण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना खालीच या म्हणालो. त्यावेळी गुंडावार हे माझे चारचाकी वाहनाजवळ आले तेव्हा त्यांचेसोबत बोहरे साहेबांचा शिपाई मतीन हा सुध्दा होता. त्यावेळी मतीन याने मला ‘तु फोन त उचल आमचावाला, फोन उचलत नाही आमचा, भाऊ तुले गाडी चालवता येते का, मला वाटलं नाही तुले गाडी येते म्हणून’ असे म्हणाला. त्यावर मी त्याला ‘ह’ असे म्हणालो. त्यानंतर गुंडावार यांनी ‘दे तुझा येरमी येरापूर चे बिलं, पाठवायचं आहे, साहेबांचा आत्त फोन आला. दे पटकनं दे, मतीनकडं दे, मतीनच्या हाताने पाठवायचे आहे. थैली आहे काय,’ असे म्हणाले त्यावर ती त्यांना ‘थैली आहे नं. साहेबान सांगितल्याप्रमाणे केले आहे भाऊ, नाही का रात्री, जे सांगितले, साहेबांचे चार, आणि वीस आपले, हयाचे टंचाईचे का , चार वीस असे म्हणालो.’ त्यावर .गुंडावार यांनी ‘तु माझे दहा कधी देते’ असे म्हणाले. त्यावर मी त्यांना हे किती बघा देता येईल हो, साहेब उगं भरोसा नाही आहे म्हणता, तुम्ही हे करा, साहेबांना फोन बी लावा, ते आठ बंडल आहेत’ असे म्हणालो.

त्यावर त्यांनी 'एक, पुन्हा एक बंडल घेवून या' असे म्हणाले. त्यावर मतीन यांनी 'पाच, पचास हजार का है क्या एक?, एक, दोन,ती, चार' असे म्हणाले असता त्यावर गुंडावार यांनी 'ठिक है, ईसे थेले मे डालो. डिक्की मे डालो, ओर निकल जाओ' असे मतीनला माझे व पंचासमक्ष गाडीमध्ये बसून असतांना म्हणाले. त्यानंतर गुंडावार यांनी बोहरे साहेब यांना त्यांचे मोबाईलवर फोन केला असता मी त्यांना 'मोबाईल स्पिकर मोडवर घ्या'' असे म्हणालो त्यावर बोहरे यांनी गुंडवार यांचा फोन उचलून स्पिकर मोडवर ठेवला. त्या दरम्यान गुंडावार यांनी 'सर मतीनला पाठवतो, लहू आला, लहूचे पॉकेट घेवून' असे बोहरे साहेब यांना म्हणाले. त्यावर मी, 'हॅलो सर, हॅलो सर' बोललो असता बोहरे यांनी फोन कट केला, त्यानंतर मी गुंडावार साहेबांना 'साहेब, म्हणतात हो लहूचा व्यवहार बरोबर नाही, देत नाही, असेही होवू शकते, आहे की नाही' असे म्हणालो असता त्यावर 'तु मुर्खासारखा करते, म्हणून ते तुले रागावते सगळे लोकं. असे गुंडावार यांनी मला सांगितले. तेव्हा मी त्यांना 'ह.ह., हे घ्या. घ्या सुशील भाऊ' असे म्हणालो. तेव्हा गुंडावार यांनी मागणी केल्याप्रमाणे 20 हजार रूपये व बोहरे साहेब यांनी मागणी केल्याप्रमाणे चार लाख रूपये गुंडावार यांचेकडे कापडी पिशवी मधून काढून दिले असता सदर लाच रक्कम गुंडावार यांनी स्वत: करीता 20 हजार रूपयांचा बंडल व उर्वरीत आठ बंडल हे पिशवितध्ये टाकून बोहरे साहेब यांचा शिपाई मतीन यांचकडे दिले. तसेच मतीन याला तू आणलेली मोपेड गाडीची डिक्कीमध्ये सदर लाच रक्कम असलेली कापडी पिशवी ठेवून बोहरे साहेब यांना त्यांची घरी जाऊन देण्यास सांगितली. त्यानंतर मतीन हा माझे गाडीचे बाहेर उतरून पैशाची कापडी पिशवी ही गाडीचे डिक्कीमध्ये टाकून वेगाने त्याचे दुचाकी गाडीने बोहरे साहेब यांचेकडे चार लाख रूपये असलेले पैशाचे बंडल असलेली पिशवी घेवून गेला. त्यानंतर त्याचे मागेच गुंडावार हे वीस हजार रूपयाचा बंडल स्वत:च्या डाव्या बाजुच्या पॅन्टच्या समोरील खिशात ठेवला व त्यांचे कक्षाकडे निघून गेले. तेव्हा मी माझ्या गाडीमधून बाहेर खाली उतरून भोसले मॅडम यांनी संगितल्याप्रमाणे जिल्हा परिषद कार्यालयाचे दर्शनी भागी येवून डाव्या हाताने आपले पॅन्टचे डाब्या बाजुचे समोरील खिशातून रूमाल काढून चेहरा पुसून रूमाल हातातच ठेवून लाच रक्कम दिल्याचा नियोजित ईशारा केला. तेव्हा भोसले मॅडम व त्यांची टीम लगेच तिथे येवून मला लाच रकमेची मागणी करून स्विकारणारे दाखवा असे म्हणाल्याने मी, त्यांना ईशा-याने गुंडावार हे त्यांचे कक्षाकडे गेले असल्याचे सांगितले. तेव्हा लगेच भोसले मॅडम व सापळा पथकातील कर्मचारी व पंच हे ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयाचे ईमारतीमध्ये असलेल्या गुंडावार यांचे कक्षाकडे गेले असता तिथे गुंडावार हे त्यांचे टेबलवर बसून होते. तेव्हा मी भोसले मॅडम यांना सांगितले की, हेच गुंडावार वरिष्ठ सहायक असल्याचे सांगितले. त्यावरून भोसले मॅडम यांनी गुंडावार यांना ताब्यात घेतले. त्यानंतर भोसले मॅडम यांनी गुंडावार यांना त्यांचा परिचय देऊन लाच रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी सदरची लाच रक्कम ही त्यांनी पॅन्टचे खिशातून काढून दाखविली. त्यावर भोसले मॅडम यांनी पंच क्र. 02 यांना सदर लाच रक्कत त्यांचे ताब्यात घेवून मोजण्यास सांगितले असता पंच क्र. 02 यांनी 20,000/-रू असल्याने सांगितले. त्यावरून उर्वरीत 4,00,000/-रू. लाच रकमेबाबत गुंडावार यांना विचारणा केली असता त्यांनी लाच रक्कम ही त्यांचे कार्यालयातील शिपाई मतीन यांचेकडे दिली असून मतीन यांना सदर लाच रक्कम घेवून बोहरे साहेब यांचे घरी नेऊन देण्याचे सांगितले असल्याने मतीन हा त्यांच मोपोड वाहनाने बी.जे.एम. कारमेल अकेडमी जवळ, एस.टी. वर्कशॉप चौक येथे बोहरे यांचे घरी गेला असल्याचे सांगितले. त्यावरून भोसले मॅडम यांनी मला लाप्रवि कार्यालय

चंद्रपूर येथे जाण्याबाबत सूचना देवून ते त्यांचे स्टाफसह बोहरे साहेब हे राहत असलेल्या पत्यावर जाऊन त्यांना ताब्यात घेवून पुढील कार्यवाही केली. (याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा क्र. 4 भोसले मॅडम यांनी तयार केला.)

तरी लाच मागणी संबंधी मी दिलेल्या तक्रारीवरून दि. 07/04/2025, 09/04/2025 झालेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान मी महाराष्ट्र शासनाच्या जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत तालुका जिवती आणि राजुरा येथील एकूण 23 गावांमध्ये पाणीपुरवठा संबंधी केलेल्या कामांची काढुन दिलेले बिले व बाकी असलेले बिले काढून देण्याकरिता मला ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर येथील सुशील गुंडावार, वरिष्ठ सहायक यांनी स्वत:करिता 20,000/-रू व बोहरे साहेब, कार्यकारी अभियंता यांनी स्वत:करिता 4,00,000/- रूपये लाचेची मागणी करून बोहरे साहेब यांनी सदरचे 4,00,000/-रू. हे तक्रारदार यांना गुंडावार यांचेकडे देण्याकरिता सांगितले असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून दि. 10/04/2025 रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान गुंडावार यांनी पंचासमक्ष मागणी करून तक्रारदार यांचेकडून 4,20,000/-रू स्विकारून त्यापैकी स्वत:करिता 20,000/-रू. काढून ठेवले तसेच उर्वरीत 4,00,000/- हे बोहरे साहेब यांचे कार्यालयीन शिपाई मतीन शेख यांचे मार्फतीने बोहरे साहेब यांचेकडे पाठविले असता बोहरे साहेब यांनी त्याचे कार्यालयीन शिपाई मतीन यांचे मार्फतीने 4,00,000/-रू. स्विकारल्याने त्याचेविरुध्द माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये कारवाई होणेस कायदेशीर तक्रार आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Asif Baktawar Sheikh (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

I.I.F.-I (एकीकृत अन वेषणफॉर्म - १)

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Asif Baktawar Sheikh

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** pcmh86017

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen ) (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल या/पाहिलेल या) शारीरिक वैशिष टये, व यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से ं.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1987 | | - | | **चेचक:** क्र. |
| 2 | पुरुष | 1981 | | - | | **चेचक:** क्र. |

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | पुरुष | 1997 | | - | | **चेचक:** क्र. |

| **Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये)** | **Teeth (दात)** | **Hair (केस)** | **Eye (डोळे)** | **Habit(s) (सवयी)** | **Dress Habit (s) (पोषाखाच्य सवयी)** |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| **Language/Dialect (भाषा/बोली)** | **Place of (चे ठिकाण)** | | | | | **Others (इतर)** |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark (भाजल्याच खुणा)** | **Leucoderma (कोड)** | **Mole (तिळ)** | **Scar (व्रण)** | **Tattoo (गोदण)** | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**